डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन
व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
२८ क्वीन्स् गार्डन, जुन्या सर्किट हाऊसजवळ, पुणे-४११ ००१. दूरध्वनी क्र. : ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३०
● E-mail : directorbarti@gmail.com ● Website : https://barti.maharashtra.gov.in ● फॅक्स :०२०-२६३३ ३५९६

दिनांक :- ०१/०२/२०१८

## शुद्धिपत्रक/ Corrigendum

### महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांना पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण देण्याकरिता प्रशिक्षण संस्था निवडीच्या स्वारस्य देकार/प्रस्ताव (EOI)

वरील विषयी दिनांक २९/०१/२०१८ रोजी ई - निविदेची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर जाहिराती नुसार दिनांक ३१/०१/२०१८ रोजी दुपारी ०३:०० वाजता निविदा पुर्व बैठक बार्टी कार्यालयात संपन्न झाली. सदर बैठकीत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

| अ. क्र. | प्रशिक्षण केंद्रांच्या प्रतिनिधींच्या सूचना | सूचनांवर घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|
| १ | प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना रु.१०००/- प्रति माह इतके विद्यावेतन बार्टी, पुणे मार्फत निश्चित करण्यात आलेले आहे, परंतु प्रशिक्षणार्थी जिल्ह्याच्या विविध भागातून येणार असून त्यांना निवास व भोजनाकरिता मदत व्हावी याकरिता विद्यावेतनाची रक्कम वाढवून देण्यात यावी. | प्रशिक्षण केंद्राच्या प्रतिनिधींनी केलेली सूचना ही व्यवहार्य असून प्रशिक्षनार्थ्यांच्या हिताचा विचार करता त्यांना निवास व भोजनाकरिता मदत व्हावी याकरिता विद्यावेतनाची रक्कम वाढवून रु.१०००/- प्रति माह वरून रु.२०००/- प्रति माह करण्याचा निर्णय मा.महासंचालक यांनी घेतला. |
| २ | प्रपत्र अ सोबत नियम-अट मधील (ड) २ अंतर्गत पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण पुस्तक संच/ स्पर्धा परिक्षा अभ्यास साहित्य/स्पर्धा परिक्षा अभ्यासाकरीता प्रशिक्षणार्थ्यांना पुरवठा करावयाचा पुस्तकांची यादी | पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण पुस्तक संच/ स्पर्धा परीक्षा अभ्यास साहित्य हे दि.०७/०२/२०१८ रोजी १६.०० वा. पर्यत बार्टी कार्यालयात स्वीकारले जातील, मात्र पुस्तक संचांची अनुक्रमणिका ही online सादर करणे बंधनकारक राहील. |
| ३ | पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण देण्याकरीता विद्यार्थ्यांची निवड करण्याकरीताची अट | प्रशिक्षण केंद्रानी विद्यार्थ्यांची निवड करताना बार्टी/ इतर शासकीय / निमशासकीय संस्थां मार्फत घेतले जाणारे सद्यास्थितीत चालु असणारे इतर उपक्रमांमध्ये सहभागी असलेले / निवड झालेल्या विद्यार्थ्यांची पुन्हा बार्टीचे पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण देण्याकरीता निवड/नाव नोंदणी करु नये तसे निदर्शनास आल्यास अशा |

| | | |
|---|---|---|
| | | प्रशिक्षण केंद्रांना काळ्या यादित टाकण्यात येईल. |
| ४ | पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण कोणत्या संस्थांना प्राधान्य राहील ? | बार्टी मार्फत हा उपक्रम प्रायोगिक तत्वावर असून ,पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण संस्था निवडीचा प्राधान्यक्रम हा आदिवासी / नक्षलग्रस्त विभागातील प्रशिक्षण संस्थाना प्रथम, त्यानंतर जिल्हास्तरावरील संस्था व नंतर तालुका व गाव पातळीवरील संस्थाना प्राधान्य राहील. |

वरील प्रमाणे निर्णय निविदामध्ये समाविष्ठ करुन सर्व निविदाधारकांना कळविण्यात यावे ही विनंती.

**महासंचालक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था, पुणे.**